# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११९३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१


रासेयो/७०५/२०१३ दि. ०९/०५/२०१३

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नीत सर्व महाविद्यालये,**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.**

**विषय : महात्मा जोतीबा फुले पाणी चळवळ अभियानांतर्गत दुष्काळी पार्श्वभुमीवर राज्यस्तरीय श्रमसंस्कार शिबीर आयोजनाबाबत...**

**मा. महोदय,**

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व ग्रीन थम्ब यांच्या संयुक्त विद्यमाने सध्याच्या दुष्काळी पार्श्वभुमीवर पुण्यातील खडकवासला धरणातील गाळ काढण्याकरीता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमार्फत राज्यस्तरीय श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात येणार असुन, सदर शिबीराच्या माध्यमातून धरणातील पाणी साठा वाढविण्यास, पर्यायी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास व दुष्काळ निवारणास मदत होणार आहे. तरी या दुष्काळग्रस्त पार्श्वभूमीवर व भविष्यात पुण्यात येणाऱ्या पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी हे महाशिबीर लाभदायक ठरणार आहे.

याकरीता राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५०० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमार्फत ७ दिवसीय दोन राज्यस्तरीय शिबीरे दि. २० ते २६ मे २०१३ व दि. २७ मे ते १ जुन २०१३ या दोन टप्प्यात आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर शिबीरामध्ये पुणे विद्यापीठातून २५० व इतर विद्यापीठांमधून २५० महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

**तरी या राज्यस्तरीय श्रमसंस्कार महाशिबीराच्या पहिल्या टप्प्यात सहभागी होण्याकरीता आपल्या महाविद्यालयातील १० स्वयंसेवीका व १० स्वयंसेवक यांना दि. १९ मे २०१३ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत केंद्रिय विद्यालय, खडकवासला, पुणे या ठिकाणी पाठवावे**. शिबीरासाठी स्वयंसेवक पाठवीताना प्राचार्यांचे पत्र सोबत असणे आवश्यक आहे, ही नम्र विनंती. कळावे,

- **प्रवास व्यवस्था** : स्वारगेट स्थानकावरून खडकवासला बस, किंवा ॲटो रिक्शा उपलब्ध आहेत.
- **सोबत वस्तु** : टोपी, कपडे (अतिरीक्त जोड), औषधे, बुट, पाण्याची बाटली, ताट, वाटी, ग्लास, टॉर्च, आंथरुण
- **नावनोंदणी : स्वयंसेवकाने ९२४३१००१४२ या नंबरवर NSSPUNE *YOUR NAME * COLLEGE NAME अशा स्वरुपात एसएमएस करून शिबीरासाठी आपली नावनोंदणी करावी.**
- **संपर्क** : रासेयो कार्यालय : नितीन – ९८२३ २८८ १३३, लेफ्ट. कर्नल सुरेश पाटील – ९३७१२०२८७५.

आपली विश्वासू

**कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**सोबत** : शिबीराचे स्वरूप, कार्यक्रम पत्रिका व स्वयंसेवकांसाठी महत्वपुर्ण माहितीपत्रक.

राष्ट्रीय सेवा योजना

पुणे विद्यापीठ

ग्रीन थम्ब

# राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ, पुणे व ग्रीन थम्ब, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# म. जोतीबा फुले पाणी चळवळ अभियान अंतर्गत

## श्रमसंस्कार महाशिबीर, दि. २० ते २६ मे २०१३, व दि. २७ मे ते १ जून २०१३

शिबारीचे स्वरूप व फायदे : तलाव परिसरातील माती/बेटे/पठारे ही जे.सी.बी./बुल्डोजर यासारख्या मोठया यंत्राच्या सहायाने काढून ती माती धरण तलावाच्या लगत वृक्षारोपण करण्यासाठी वापरणार आहेत. हे काम २० मे २०१३ पासून सुरू करून हजारो ट्रक माती तलावातून काढण्यात येणार आहे व त्यामुळे पुण्यासाठी लाखो लिटर पिण्याच्या पाण्याचा लाखो लिटर साठा वाढण्यास मदत होणार आहे. त्याच प्रमाणे या शिबीरामुळे पुण्यासाठी नवीन धरण बांधण्याची आवश्यकता भासणार नाही.

तसेच तलावाच्या (अंदाजे २२ कि.मी. परिसरात) एका बाजूने २० मीटर लांबीच्या क्षेत्रामध्ये अंदाजे ५० लाख झाडे लावण्याचा संकल्प केलेला आहे. यामध्ये स्थानिक व विविध जातींच्या वृक्षांचे वृक्षारोपण करून वृंदावन विकसित करीत आहोत. सदर मोहिमेमध्ये जलसंपदा विभाग, पुणे महानगरपालिका, पी.डब्ल्यू.डी. (यांत्रिकी विभाग), स्थानिक रहिवासी, खडकवासला गावातील शेतकरी, माजी सैनिक, काही युवक संघटना सक्रीय स्वरूपात मदत करीत आहेत.

### कार्यक्रम रुपरेषा

| वेळ | कार्यक्रमाचे स्वरूप | ठिकाण |
|---|---|---|
| स. ५ ते ६.३० | स्नान व योगासने | शिबीर निवासस्थानी |
| स. ६.३० ते दु. १२.३० | श्रमदान | खडकवासला धरण परिसर |
| दु. १२.३० ते दु. २.३० | स्नान, भोजन, विश्रांती | शिबीर निवासस्थानी |
| दु. २.३० ते सायं. ४.३० | व्याख्यान - सत्र १ | शिबीर निवासस्थानी |
| सायं. ४.३० ते सायं. ६.०० | व्याख्यान - सत्र २ | शिबीर निवासस्थानी |
| सायं. ६.३० ते रा. ८.३० | चर्चासत्र, समाजप्रबोधनपर चित्रपट | शिबीर निवासस्थानी |
| रा. ८.३० ते रा. १०.३० | भोजन | शिबीर निवासस्थानी |

सुचना : स्वयंसेवकांनी दि. १९ मे २०१३ रोजी सायं. ४ वा. पर्यंत खडकवासला येथील केंद्रिय विद्यालय, खडकवासला या ठिकाणी पोहचावे. स्वारगेट वरून सिहंगडच्या बसेस, रिक्षा उपलब्ध आहेत.

सोबत : टोपी, कपडे (अतिरीक्त जोड), औषधे, बुट, पाण्याची बाटली, ताट, वाटी, ग्लास, टॉर्च, आंथरुण, पांघरूण

टिप : स्वयंसेवकांनी मौल्यवान वस्तू आणू नयेत.







नावनोंदणी साठी खालील मोबाइल नंबरला एसएमएस करावा–

**9243 100 142**

**NSSPUNE * YOUR NAME * COLLEGE NAME**

राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणे ४११ ००७, नितीन - ९८२३ २८८ १३३

– त्रिशक्ती फौंडेशन –
लेफ्ट. कर्नल सुरेश पाटील, मो. ९३७१ २०२ ८७५